# प्रकरण - ३

## प्राचार्यांचे योगदान

# प्रकरण तिसरे

## प्राचार्यांचे योगदान

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये व विकासामध्ये या महाविद्यालयाच्या भूतपूर्व प्राचार्यांचा मोठा सहभाग आहे. या महाविद्यालयाला बुद्धीमान, कार्यकुशल, सेवाभावी, कर्तृत्ववान असे प्राचार्य लाभले आहेत. या प्राचार्यांनी संस्थेच्या ध्येयाशी, कार्याशी एकनिष्ठ राहून महाविद्यालयाचा विकास घडवून आणला. १९६७ साली किर्ती महाविद्यालयाचे ताराराणी विद्यापीठाकडून रयत शिक्षण संस्थकडे हस्तांतर झाले. १९६७ पासून २००५ पर्यंत १३ प्राचार्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान दिले आहे.

प्राचार्य व त्यांचा महाविद्यालयातील कार्यकाळ -

| | | | कालखंड |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील | ... | १९६७- १९६९ |
| २) | प्राचार्य रा. ज्ञा. गायकवाड | ... | १९६९-१९७५, १९७८-१९८० |
| ३) | प्राचार्य सुमतीबाई पाटील | ... | १९७५- १९७८ |
| ४) | प्राचार्य आर. डी. गायकवाड | ... | १९७८- १९८० |
| ५) | प्राचार्य एम. एम. स्वामी | ... | १९८१- १९८३ |
| ६) | प्राचार्य डॉ. एम. आर. सुर्यवंशी | ... | १९८३- १९८५ |
| ७) | प्राचार्य ए. एच. गरूड | ... | १९८५- १९८९ |
| ८) | प्राचार्य बी. एन. शिंदे | ... | १९८९- १९९१ |
| ९) | प्राचार्य व्ही. के. घाटे | ... | १९९१- १९९३ |
| १०) | प्राचार्य मा. के. यादप | ... | १९९३- १९९५ |
| ११) | प्राचार्य व्ही. के. घाटे | ... | १९९५- १९९८ |
| १२) | प्राचार्य आर. जी. पाटील | ... | १९९८- २००० |

१३) प्राचार्य व्ही. व्ही. भोसले ... २०००- २००३

१४) प्राचार्य व्ही. एस. लिपारे ... २००३ - २००५

१५) प्रभारी प्राचार्य सुमंत जगताप ... १/२/२००५ - १४/९/२००५

१६) प्राचार्य व्ही. एस. शिवणकर ... १४/९/२००५ पासून पुढे[१]

**प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील -**

कोल्हापूरमध्ये ताराराणी विद्यापीठ या संस्थेने १९६१ साली 'किर्ती महाविद्यालय' सुरू केले. पुढे काही अडचणींमुळे जून १९६७ मध्ये या महाविद्यालयाचे रयत शिक्षण संस्थेकडे हस्तांतरण करण्यात आले. सदर महाविद्यालय रयत शिक्षण संस्थेकडे आल्यानंतर प्राचार्य म्हणून कोणाची नेमणूक करावयाची याबद्दल चर्चा सुरू होती. श्री ए. डी. देसाई वकील यांनी प्राचार्य म्हणून बॅ. पी. जी. पाटील यांचे नांव सुचविले त्यावेळी बॅ. पी.जी. पाटील कराडच्या सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयामध्ये प्राचार्य होते. तेथे एम.ए. (एंटायर इंग्लीश)चे वर्ग होते. तेथे बॅ. पी. जी. पाटील व सुमतीबाई पाटील असे दोघेजण विद्यापीठ मान्यता प्राप्त पदव्युत्तर शिक्षक होते. तेथील एम.ए.च्या विद्यार्थ्यांचे नुकसान हाऊ नये म्हणून बॅ. पी. जी. पाटील शनिवार रविवार कराडला येऊन तास घेऊ लागले. सोमवार ते शक्रवार ते कोल्हापूरला किर्ती महाविद्यालयाची जबाबदारी पार पाडत असत.[२]

जून १९६७ मध्ये बॅ. पी. जी. पाटील यांची किर्ती महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नेमणूक झाली. त्यावेळी महाविद्यालयामध्ये प्रा. अंबादास माडगूळकर, प्रा. सुर्यकांत खांडेकर, प्रा. चंद्रकांत पाटगावकर, डॉ. गिंडे, डॉ.कु. जोशी, डॉ. टिकेकर, प्रा. कणंगलेकर, प्रा. ठक्कर, प्रा. ठोंबरे व प्रा. शिवाजीराव चव्हाण हे अधिव्याख्याता पदावर कार्यरत होते. या सर्वांच्या सहकार्याने त्यांनी दोन वर्ष महाविद्यालयाचा कारभार यशस्वीपणे साभाळला. बॅ. पी. जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच खेळ, कुस्ती, सहली, गॅदरींग इ. मध्ये प्रोत्साहन दिले. १९६७ साली कोयनानगरला

भुकंपाचा प्रचंड धक्का बसला, त्यावेळी प्रा. पाटगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली एक मोकठी तुकडी कोयनानगरच्या मदत कार्यासाठी गेली. १५ दिवस भूकंपग्रस्तांना मदतीचे वाटप करणे, तात्पुरते निवारे उभारणे इ. कार्य त्यांनी केले.[३]

किर्ती महाविद्यालयास स्वतःची अशी जागा नव्हती. बॅ. पी. जी. पाटील यांच्यासमोर महत्त्वाचे व तातडीचे काम म्हणजे महाविद्यालयासाठी स्वतंत्र जागा मिळवून तेथे आपली स्वतःची इमारत तयार करणे हे होते. त्यांनी शासकीय पातळीवर हालचाल सुरू केली. अनेक प्रयत्नानंतर नामदार बाळासाहेब देसाई यांच्या सहकार्याने संस्थेस कदमवाडी येथे तीन एकर सरकारी जमीन मोफत मिळाली.[४]

सुरूवातीला किर्ती महाविद्यालय दोन वर्षासाठी ताराराणी विद्यापीठामध्ये सुरू होते. दोन वर्षानंतर महाविद्यालयासाठी भाडयाने जागा मिळविणे आवश्यक होते. बॅ. पी. जी. पाटील यांच्या प्रयत्नातून महाविद्यालयास महाराष्ट्र हायस्कूलच्या इमारतीमध्ये भाड्याने जागा मिळाली. बॅ. पी. जी. पाटील यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनामुळेच श्री पी. जी. पाटील हा विद्यार्थी घडू शकला. या विद्यार्थ्यामुळेच किर्ती महाविद्यालयाचे नाव संपूर्ण देशभर गाजले. या विद्यार्थ्याने कुस्तीमध्ये सुवर्णपदक मिळविले हाते.[५]

बॅ. पी. जी. पाटील यांनी १९६७ ते १९६९ या दोन वर्षामध्ये अतिशय प्रतिकूल परिस्थितीत महाविद्यालयाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

**प्राचार्य श्री. राम गायकवाड -**

३ ऑगस्ट १९६९ पासून किर्ती महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून रयत शिक्षण संस्थेने प्राचार्य श्री राम गायकवाड यांची नियुक्ती केली. त्यावेळेस किर्ती महाविद्यालय महाराष्ट्र हायस्कूलच्या इमारतीमध्ये सुरू होते.[६] १९६९ मध्ये प्राचार्य आर. डी. गायकवाड यांच्या कारकिर्दीमध्ये महाविद्यालयाचे "राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज" असे

नामांतर करण्यात आले. जून १९७१ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय कावळा नाका (ताराराणी चौक) ते कदमवाडी या रस्त्यावर स्वतःच्या इमारतीमध्ये सुरू झाले. प्राचार्य आर.डी. गायकवाड यांच्या कारकिर्दीमध्ये महाविद्यालयामध्ये १९७१ साली वसतीगृहास व 'कमवा व शिका' योजनेस सुरूवात झाली.[७]

प्राचार्य राम गायकवाड यांच्या कारकिर्दीमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकास शिवाजी पेठेतून कावळा नाक्याकडे हालविले गेले. महाविद्यालय लांब गेल्यामुळे विद्यार्थी संख्या घटेल असे सर्वांना वाटले. परंतु असे काही घडले नाही. महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या वाढतच राहिली. याच कालावधीत प्राचार्य श्री. राम गायकवाड, आमदार श्री एन. डी. पाटील, श्री मेघाजी कांबळे, श्री शशिकांत दैठणकर याच्या प्रयत्नामुळे महाविद्यालयास आणखी तीन एकर जागा मिळाली.[८]

प्राचार्यांच्या प्रेरणेमुळे व मार्गदर्शनामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासाबरोबर क्रिडांगणावरही नावलौकीक मिळवू लागले. ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कबड्डी व कुस्ती या खेळांमध्ये महाविद्यालय सतत अग्रेसर राहू लागले. कुस्तीमध्ये महाविद्यालयीन संघ अजिंक्य राहिला. महाराष्ट्र केसरी पदही काही विद्यार्थ्यांनी मिळविले. श्री आप्पा कदम, श्री कृष्णा कळंत्रे, श्री आर. डी. पाटील, श्री पी. जी.पाटील, श्री नामदेव पाटील, श्री भिकू मांडवे, रंगा पाटील, श्री संभाजी पाटील, श्री पंडित केणे, श्री तलवार, श्री सारंग इ. कुस्तीगिरांनी महाविद्यालयाचे नाव देशभर व देशाबाहेरही गाजविले. श्री आर. बी.पाटील, श्री पांडुरंग शेणवी, श्री बजरंग देसाई, संभा पाटील, कुमारी कदम, कुमारी घाटगे, यांनी दैदिप्यमान यश मिळविले. याच काळामध्ये श्रीमती माया जाधव, श्रीमती कांचन परूळेकर, श्री राजकुमार दैने, श्री आप्पासाहेब देसाई, उपराकार लक्ष्मण माने, 'जिहाद'कार हुसेन जमादार यांसारखे विद्यार्थी घडले.[९]

प्राचार्य आर.डी. गायकवाड यांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले. शाहू राजांच्या नावाने सुरू झालेल्या या महाविद्यालयामध्ये पैलवान असावेत कारण कर्मवीर आण्णा व शाहू महाराज यांना पैलवानांबद्दल आस्था होती. म्हणून प्राचार्य गायकवाड सर यांना शिवाजी विद्यापीठामार्फत जाणारा कुस्ती संघ हा 'फक्त शाहू महाविद्यालयाचा' असावा असे सतत वाटायचे. म्हणूनच सरांनी दिग्गज पैलवान महाविद्यालयात आणले. खेळाडूंकडे पाहण्याची त्यांची दृष्टी निराळी होती. त्यामुळेच त्यांच्या कारकिर्दीतील फळे आज मिळत आहेत. त्यांनी क्रीडा क्षेत्राचा भक्कम पाया घातला.[१०]

प्राचार्य आर. डी. गायकवाड यांच्या कारकिर्दीमध्ये महाविद्यालयासाठी ३ एकर जागा, १९७१ साली इमारतीच्या तळमजल्याच्या आठ खोल्या, प्राचार्य निवास, मुलांच्या वसतीगृहाचा तळमजला, इ. बांधकाम झाले.[११]

प्राचार्य आर. डी. गायकवाड यांची पुन्हा १९७८ मध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाली. १९७८ ते १९८१ या दरम्यान सरांनी राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला. या कालावधीमध्ये सरांनी इमारतींचा आराखडा बनविला. गायकवाड सरांनी क्रिडांगणाला विशेष महत्त्व देत त्यासाठी ३० ते ३५ हजार रूपये खर्च केले.[१२]

**प्राचार्या सुमतीबाई पा. पाटील -**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये प्राचार्या सुमतीबाई पाटील यांनी १९७५ ते १९७८ या कालावधीमध्ये कार्यभार सांभाळला. त्यांनी या कालावधीत महाविद्यालयाची प्रगती साधली.[१३] प्राचार्या सुमतीबाई पाटील यांच्या कालावधीमध्ये उपहारगृहाची इमारत बांधली गेली.[१४]

प्राचार्या सुमतीबाई पाटील यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच कुस्ती, टेबलटेनिस, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, कबड्डी इ. क्रिडांगणावरील खेळातही प्रेरणा व मार्गदर्शन

केले. त्यांनी आपल्या शिष्याप्रमाणे खेळाडूंना वागणूक दिली. त्यांच्या कारकिर्दीमध्ये महाविद्यालयीन कबड्डी संघ विद्यापीठामध्ये पहिला आला होता. हा संघ ७ वाजता महालक्ष्मीने रेल्वे स्टेशनवर येणार हे समजल्यावर मॅडम सर्व कॉलेजसह स्वत: रेल्वे स्टेशनवर स्वागतासाठी हजर राहिल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही महाविद्यालयासंबंधी जिव्हाळा निर्माण झाला.[१५]

शहाजी धुमाळ, कृष्णा कळंत्रे, मारूती पाटील, चंद्रकांत चव्हाण, शोभा पाटगावकर, इ. विद्यार्थी या कालावधीमध्ये घडले. प्राचार्या सुमतीबाई पाटील यांनी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनाही योग्य असे मार्गदर्शन केले.[१६]

**प्राचार्य एम. एम. स्वामी -**

मे १९८१ मध्ये प्राचार्य श्री एम. एम. स्वामी यांची शाहू महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाली. शाहू महाविद्यालयापुढे त्यावेळी काही समस्या होत्या. महाविद्यालयाच्या वर्गासाठी असलेल्या दहा खोल्या विद्यार्थी संख्येच्या मानाने अपुऱ्या होत्या. त्यामुळे इमारतीच्या पहिल्या मजल्याचे काम करणे गरजेचे होते. इमारतीसमोर असलेल्या क्रिडांगणाचे सपाटीकरण करणे आवश्यक होते. महाविद्यालयाच्या आसपासचे वातावरणही तसे अल्हाददायक नव्हते. अशा परिस्थितीतही महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी यांच्या सहकार्याने सरांनी इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामास सुरूवात केली. इमारतीचे संपूर्ण गवंडी काम महाविद्यालयाचे सेवक व श्रम योजनेतील विद्यार्थी यांच्या सहाय्याने सरांनी पूर्ण करून घेतले. इमारतीच्या सेंट्रींगचे कामही याच माध्यमातून पूर्ण केले.[१७]

प्राचार्य स्वामी सरांनी दोन वर्षाच्या कारकीर्दीत महाविद्यालयामध्ये समाजाभिमुख विविध उपक्रमही राबविले. महाविद्यालयाचा परिसर झोपडपट्टीवासियांनी गजबजलेला

होता व आहे. सर्वसामान्य माणसांचा सहवास महाविद्यालयाच्या हिताचा कसा करता येईल याचा विचार प्राचार्य एम. एम. स्वामी सर यांच्या मनामध्ये नेहमीच सुरू असे. यादृष्टीने महाविद्यालयाचा त्यांच्याशी निरनिराळ्या मार्गाने संपर्क ठेवण्याचा प्रयत्न सरांनी केला. कै. लक्ष्मीबाई पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त झोपडपट्टीवासियांना महाविद्यालयातर्फे अन्नदान करण्यात आले.[१८]

शाहू महाविद्यालयाची क्रिडापरंपरा वाखाणण्यासारखी आहे. कबड्डी, कुस्ती, बॅडमिंटन यासारख्या खेळात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले आहे. तथापी महाविद्यालयास भव्य क्रिडांगणाची कमतरता भासत होती. महाविद्यालयासमोर महाविद्यालयाच्या मालकीची सुमारे सहा एकर जमीन होती. परंतु ती खडकाळ व उंचसखल होती. या जागेचे सपाटीकरण करून घेणे आवश्यक होते. प्राचार्य एम. एम. स्वामी सरांनी श्री श्रीकांत घाटगे व प्रा. आर. बी. पाटील यांच्या सहकार्याने क्रिडांगण सपाटीकरणाचे काम हाती घेतले.[१९]

सरांनी दोन वर्षांच्या कारकिर्दीमध्ये इमारत बांधकाम व क्रिडांगण सपाटीकरण ही महत्वपूर्ण कामे हाती घेतली. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची टाकी व वृक्षारोपण ही दोन कामेसुद्धा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. सरांनी वरील रचनात्मक कामाबरोबर शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीकडेही लक्ष दिले. महाविद्यालयीन इमारतीसाठी आर्थिक निधी जमा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.[२०]

**प्राचार्य डॉ. एस. आर. सुर्यवंशी -**

प्राचार्य डॉ. एस. आर. सुर्यवंशी यांची १६ मे, १९८३ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये प्राचार्यपदी नियुक्ती झाली. महाविद्यालयाच्या आवारामध्ये झाडांची कमतरता, झाडांसाठी आवश्यक पाण्याची कमतरता, अपुरे वसतीगृह, मुख्य

इमारतीचे अपूर्ण बांधकाम, अपूर्णावस्थेतील क्रिडांगण, लहान कार्यालय, स्टाफरूम, ग्रंथालय अशा अनेक समस्या महाविद्यालयामध्ये होत्या.[२२]

सरांनी महाविद्यालयामध्ये रूजू झाल्यापासून इमारत बांधकाम सतत सुरू ठेवले. मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या १२ खोल्यांपैकी ४ खोल्या पूर्ण झाल्या होत्या व इतर ४ खोल्यांवर स्लॅब टाकला होता. या ४ खोल्यांचे बांधकाम पूर्ण करून मधील जिना व ४ खोल्या आणि दुसऱ्या मजल्यावर एक हॉल एवढे बांधकाम १९८३-८४ या सालात पूर्ण केले. १९८४-८५ या सालात जेथे ग्रंथालय होते, तेथे ४ हॉल पूर्ण होऊन त्याच्या वरच्या मजल्याचा स्लॅब पूर्ण केला. तसेच महाविद्यालयात उपहारगृहाशेजारील भोजनगृह इमारतीचे बांधकाम झाले. प्राचार्यांचे केबीन, प्राध्यापकांसाठी स्टाफरूम तयार केली व नवीन फर्निचर आणले.[२३]

क्रिडांगण अपुरे असल्यामुळे शेजारील ३ एकर शासनाची जागा मिळविण्याचा प्रयत्न सरांनी केला. कोल्हापूरचे कलेक्टर दिनकरराव पाटील व त्यावळचे मुख्यमंत्री वसंतरावदादा यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालयास ती जागा मिळाली. महाविद्यालयाने २५,०००/- रू. भरून ३ ऑगस्ट, १९८४ रोजी ती जागा ताब्यात घेतली. त्यासाठी समाजातून मदतीच्या रूपाने आर्थिक निधी उभा करण्यात आला.

जागा मिळताच यांत्रिक पद्धतीने त्याचे सपाटीकरण करण्यात आले. पाण्याची सोय व्हावी म्हणून दोनदा वॉटरसर्वे करून घेतला. श्री. कदम यांच्या मदतीने महाविद्यालयाच्या ग्राऊंडमध्ये पाण्याचे बोअर मारून घेतले. त्याला भरपूर पाणी लागल्यामुळे तेथे वीज व मोटर बसविण्यात आली. पाणी मुबलक असल्यामुळे परिसराचा विकास सहज शक्य झाला. बोआरच्या ठिकाणी दोन खोल्यांचे बांधकामही पूर्ण केले.[२४]

प्राचार्य एस. आर. सुर्यवंशी यानी आपल्या कारकिर्दीमध्ये महाविद्यालयाची भौतिक प्रगती तर केलीच त्याचबराबर विद्यार्थी विकासासाठी विविध योजना व उपक्रम यशस्वीरित्या राबविले. महाविद्यालयामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील कडकनाथवाडीसारख्या छोट्या वाडीतून विद्यार्थी स्वावलंबनाने शिक्षणासाठी आले होते. त्याच्यासाठी सरांनी 'कमवा व शिका' या योजनेद्वारे विविध कामे उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांकडून इमारतीसाठी काळा पत्थर फोडून तळमजला तयार करून घेणे, लहानशा टेकडांनी व खड्डयांनीयुक्त अशी उंचसखल जमीन एका पातळीची करणे, मोकळ्या पडलेल्या पट्टयातून भाजीपाला व इतर पिके घेणे, उपहारगृहामध्ये काम करणे इ. विविध प्रकारची कामे स्वावलंबी शिक्षण योजनेतील विद्यार्थ्यांना देण्यात आली. याशिवाय इतर विद्यार्थ्यांना शहरामध्ये डॉक्टर, दुकानदार, फॅक्टरी इ. कडे कामे मिळवून दिली.[२५]

**प्राचार्य आण्णासाहेब गरूड -**

प्राचार्य एस. आर. सुर्यवंशी यांच्यानंतर प्राचार्य आण्णासाहेब गरूड यांचे नेतृत्व महाविद्यालयास लागले. १६ मे, १९८५ रोजी प्राचार्य आण्णासाहेब गरूड यांनी महाविद्यालयाची सूत्रे हाती घेतली.[२६] जून १९८५ पासून विनाअनुदान तत्त्वावर महाविद्यालयास विज्ञान शाखेचा अकरावीचा वर्ग सुरू करण्यास शासनाची मान्यता मिळाली. दुसऱ्या वर्षी बारावी विज्ञान शाखेचा अकरावीचा वर्ग विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास परवानगी मिळाली. सरांनी अत्यंत कौशल्यपूर्ण विनाअनुदान तत्त्वावर दोन वर्ष विज्ञान शाखा चालविली. विज्ञानशाखेसाठी महाविद्यालयात सुसज्ज अशी प्रयोगशाळा उभारली. १९८७ पासून बी.एस्सी. भाग-१ चा वर्ग महाविद्यालयात सुरू करण्याबाबत परवानगी मिळविण्यासाठी सरांनी प्रयत्न केले.[२७]

१९८६-८७ हे वर्ष महाविद्यालयाचे रौप्यमहोत्सव वर्ष होते. या वर्षानिमित्त महाविद्यालयात अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडले. याच वर्षी महाविद्यालयाच्या क्रिडा विभागास विभागीय स्पर्धांचे यजमानपद मिळाले. या निमित्ताने महाविद्यालयासमोर भव्य असा रनिंग ट्रॅक तयार करण्यात आला. कोल्हापूर शहरामध्ये भव्य असा स्वतःचा ट्रॅक असणारे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय आहे. हा ट्रॅक तयार करण्यासाठी श्रीकांत घाटगे व श्री पोवार यांचे सहकार्य लाभले. यजमानपदाची जबाबदारी पार पाडण्यासाठी भव्य क्रिडांगण व त्यावर चारशे मिटरचा ट्रॅक तयार करण्याचे अवघड काम महाविद्यालयाने युद्धपातळीवर केले. यासाठी १ लाख रूपयापर्यंत खर्च आला.[२८]

महाविद्यालयास या वेळेपर्यंत कायमस्वरूपी व्यासपीठ नव्हते- स्नेहसंमेलनातील विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम अन्यत्र कोठेतरी सभागृहात घ्यावे लागत. यावर उपाय म्हणून सरांनी महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीला जाडून पोर्चमध्ये भव्य असे कायमस्वरूपी व्यासपीठ बांधून घेतले.[२९]

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर प्राचार्यांचा प्रतिनिधी म्हणून विधीसभेमधून प्राचार्य आण्णासाहेब गरूड यांची निवड झाली. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर गरूड सरांना पर्यायाने शाहू महाविद्यालयास प्रतिनिधीत्व मिळण्याचा बहुमान मिळाला.[३०]

महाविद्यालयाच्या उत्कर्षासाठी, विकासासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सरांनी चार लाखाची योजना अनुदानासाठी पाठविली. गरूड सरांच्या कारकिर्दीमध्ये महाविद्यालयाच्या भव्य वास्तूला रंगकाम करून घेण्यात आले.[३१]

**प्राचार्य बी. एन. शिंदे -**

प्राचार्य आण्णासाहेब गरूड सरानंतर राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजची सूत्रे

प्राचार्य बी. एन. शिंदे यांनी स्वीकारली. १९८९ मध्ये प्राचार्य बी. एन. शिंदे यांची शाहू महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाली.

महाविद्यालयातील वर्षभरातील कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य बी. एन. शिंदे यांनी सातत्याने मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना, एन.एस.एस., 'कमवा आणि शिका' योजना, या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासू व्यक्तीची व्याख्याने आयोजित केली. 'कमवा आणि शिका' योजनेतील विद्यार्थ्यांसाठी कामे उपलब्ध करून दिली. सरांनी महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. भाग-१ चे वर्ग सुरू करण्यासाठी प्रयत्न केले.[३२]

१९८९ च्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभिक काळात राज्य पातळीवरील विविध स्पर्धांसाठी विद्यार्थी तयार करण्याची एक योजना संस्थेने कार्यवाहीत आणली. सदर योजना सरांनी महाविद्यालयामध्ये राबविली. या योजनेनुसार महाविद्यालयामध्ये फौजदार पदाच्या पूर्वतयारीसाठी व उपजिल्हाधिकारी या पदाच्या पूर्वतयारीसाठी वर्ग सुरू केले. सरांनी खेळाडूंना वसतीगृहातील विद्यार्थ्यांना, 'कमवा आणि शिका' योजनेतील विद्यार्थ्यांना वेळोवेळी प्रेरणा दिली व मार्गदर्शन केले. १९८९ ते १९९१ या कालावधीमध्ये प्राचार्य बी. एन. शिंदे यांनी महाविद्यालयाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.[३३]

**प्राचार्य व्ही. के. घाटे -**

माननीय प्राचार्य व्ही. के. घाटे यांनी दोन वेळा राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची सूत्रे सांभाळली. १९९१ ते १९९३ व १९९५ ते १९९८ या कालावधीमध्ये सरांनी महाविद्यालयातील प्राचार्यपद सांभाळले.[३४]

सरांनी १९९१ ते १९९३ या काळामध्ये महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील उरलेल्या चार खोल्या पूर्ण केल्या.[३५] वसतीगृहातील विद्यार्थ्यांना

अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. वसतीगृहाला जोडून नवीन तीन स्वच्छतागृहे व प्रशस्त असे स्नानगृह बांधून दिले. वसतीगृहाच्या इमारतीची डागडूजी करून रंगरंगोटी करण्यात आली. विद्यार्थ्यांना पुरेसा पाणीपुरवठा व्हावा म्हणून पाण्याची आणखी एक टाकी बसविण्यात आली.[३६]

१९९१-९२ या शैक्षणिक वर्षामध्ये कोल्हापूरच्या माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष मा. बळीरामजी मोरे व शिवाजी विद्यापीठ समितीतील डॉ. कुलकर्णी व प्रा. डी. यू. पवार यांनी महाविद्यालय वसतीगृहाची पाहणी करून महाविद्यालयाचया प्रगतीबद्धल समाधान व्यक्त केले.[३७]

१९९१-९२ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राचार्य डॉ. व्ही. के. घाटे सरांना राज्य सरकारचा 'आदर्श शिक्षक' हा पुरस्कार मिळाला.[३८]

खेळाडूंवर सरांचे विशेष प्रेम होते. महाविद्यालयीन खेळाडूंनी स्पृहनीय असे यश मिळवून महाविद्यालयाची किर्ती वाढविली. सरांनीही खेळाडूंना प्रेरणा व प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर महाविद्यालयीन विविध उपक्रम, योजना, स्पर्धा यासंदर्भात प्राध्यापक व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे समाजाशी जिव्हाळ्याचे नाते आहे, याची प्रचिती पुन्हा एकवेळ भूकंपासारख्या आपत्तीमध्ये दिसून आली. १९९३-९४ मध्ये मराठवाड्यातील लातूर-किल्लारी येथे भूकंप झाला त्यावळेस भूकंपग्रस्तांविषयी जगभर अनुकंपा निर्माण झाली. महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी, प्रशासकीय सेवक यांनी दोन दिवसाचा पगार देवून भूकंपपिडीतांना आर्थिक सहकार्य केले.[३९]

१९९३-९४ या वर्षामध्ये प्राचार्य डॉ. व्ही. के. घाटे यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रकुलगुरू पदावर नियुक्ती झाली.[४०] ही बाब वैयक्तिकरित्या सरांसाठी भूषणावह होतीच पण महाविद्यालय आणि संस्था यांचाही तो मोठा सन्मान होता.

१९९५-९६ च्या दुसऱ्या सत्रामध्ये पुन्हा प्राचार्य डॉ. व्ही. के. घाटे सरांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी सूत्रे हाती घेतली. संस्थेचे 'सहसचिव', 'आदर्श शिक्षक', शिवाजी विद्यापीठाच प्रभारी कुलगुरू असे आदरणीय प्राचार्य महाविद्यालयास लाभले. त्यांच्या विद्वत्तापूर्ण व्यक्तिमत्त्वाचा महाविद्यालयाच्या वाटचालीत खूपच उपयोग झाला.[४१] १९९७ मध्ये प्राचार्य डॉ. व्ही. के. घाटे यांची रयत शिक्षण संस्थेच्या सचिवपदी नियुक्ती झाली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी महाविद्यालयामध्ये १९९७ पासून सरांनी गुणवत्तावाढ प्रकल्प हाती घेतला.[४२]

**प्राचार्य श्री. मा. के. यादव -**

रयत शिक्षण संस्थेने ऑगस्ट १९९३ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये प्राचार्य श्री. मा. के. यादव यांची नियुक्ती केली.[४३] प्राचार्य यादव यांच्या काळामध्ये १९९४ साली महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. भाग-१ ची सुरूवात झाली.

सरांनी महाविद्यालयाची सूत्रे हाती घेतल्यानंतर महाविद्यालयात अनेक भौतिक सुधारणा केल्या. महाविद्यालयात जिमखाना, ड्रेसिंग रूम, संगणक कक्ष, व्यवसाय अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या तीन खोल्या बांधून घेतल्या. ग्रंथालय इमारतीचे बांधकाम पूर्णत्वाच्या दिशेने सुरू ठेवले.[४४]

महाविद्यालयाच्या भौतिक प्रगतीबरोबरच सरांनी शैक्षणिक प्रगतीही घडवून आणली. महाविद्यालयातील १२ वी व्याख्यानमाला, स्टाफ अकॅडेमी, विद्यार्थी दत्तक योजना, कमवा आणि शिका योजना इ. योजना, विविध सामाजिक उपक्रम स्पर्धा परीक्षा इ. कामकाज यशस्वीपणे पार पाडले. खेळाडूंना प्रोत्साहन व प्रेरणा दिली. कवी हृदयाच्या व संतसद्‌भाव जपणाऱ्या प्राचार्यांनी आपल्या कुशल कार्याचा सर्वांगीण ठसा विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय सेवकांवर उमटविला.[४५]

१९९३-९४ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयीन खेळाडूंनी नेत्रदिपक असे यश मिळविले. महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने शिवाजी विद्यापीठाची 'तवनाप्पा पाटणे' प्रथम क्रमांकाची फिरती ढाल जिंकली. महाविद्यालयाच्या जिम्नॅस्टिक संघाने 'कै. कर्मवीर मामासाहेब जगदाळे स्मृती ट्रॉफी' जिंकली. कुस्ती संघाने शिवाजी विद्यापीठाची 'शिरगावकर ब्रदर्स' ही फिरती ढाल जिंकून विद्यापीठात अजिंक्यपद कायम ठेवले. खेळाडूंच्या यशामागे प्राचार्यांची प्रेरणा व मार्गदर्शन होते.[४६]

**प्राचार्य आर. जी. पाटील -**

१९९८ मध्ये प्राचार्य आर. जी. पाटोल यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची सूत्रे होती घेतली. प्राचार्य आर. जी. पाटील यांनी १९९८-२००० या दोन शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी महाविद्यालयात १९९७ पासून गुणवत्तावाढ प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. प्राचार्य आर. जी. पाटील यांनी हा प्रकल्प अतिशय यशस्वीपणे महाविद्यालयात राबविला. महाविद्यालयातील विविध स्पर्धांना, योजनांना, उपक्रमांना, विविध समित्यांना, खेळाडूंना सरांनी योग्य प्रकारे प्रेरणा देवून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विषयांवरील उपयुक्त अशी व्याख्याने आयोजित केली.[४७]

**प्राचार्य व्ही. व्ही. भोसले -**

जुलै २०००-०१ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राचार्यपदी प्राचार्य व्ही. व्ही. भोसले यांची नियुक्ती झाली. याअगोदर ते सोलापूरच्या लक्ष्मीबाई भाऊराव महिला महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते कार्यभार सांभाळत होते.[४८]

सरांच्या कारकिर्दीमध्ये महाविद्यालयातील व्यायामशाळा अद्ययावत झाली. याच वर्षी अनिवासी विद्यार्थी भवनासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

यांचेकडून अनुदान मिळाले. दि. २/२/२००१ रोजी 'अनिवासी विद्यार्थी भवना'चा पायाभरणी व कोनशिला समारंभ डॉ. पतंगराव कदम (तत्कालीन उद्योग व जलसंधारण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई) ह्यांच्या हस्ते संपन्न झाला.[४९]

सरांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी खेळ, निबंध स्पर्धा, गायन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यामध्ये यश संपादन केले. प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनाही सरांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.[५०]

२००२-०३ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. व्ही. भोसले ह्यांची शिवाजी विद्यापीठाच्या विधीसभेवर आणि कार्यकारिणीवर सदस्य म्हणून निवड झाली.[५१]

'नॅक'कडून २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाचे मूल्यमापन होणार हाते. या कमिटीला सामोरे जाण्यासाठी महाविद्यालयात अनेक बदल व सुधारणा प्राचार्य व्ही. व्ही. भोसले सरांनी केल्या. मूल्यांकन करवून घेण्याची सर्व पूर्वतयारी सरांनी करून घेतली.[५२]

सरांनी आपल्या कारकिर्दीमध्ये विद्यार्थी भवनाचे बांधकाम पूर्ण केले. तसेच विद्यार्थ्यांसाठी रिडींग रूमसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली येथे प्रस्ताव पाठविला.[५३]

विद्यार्थी हजेरी, वेळापत्रक, अभ्यासक्रम नियोजन, गुणवत्ता **वाढ** प्रकल्प, विद्यार्थी दत्तक योजना इ. उपक्रम यशस्वीपणे राबविले. २००० ते २००३ या शैक्षणिक वाटचालीच्या यशामागे सरांची शिस्तप्रियता, प्रशासन कुशलता ही वैशिष्ट्ये कारणीभूत ठरली.

**प्राचार्य व्ही. एस. लिपारे -**

सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. व्ही. भोसले यांची उंब्रज येथे बदली झाली. त्यांच्या जागी पुसेगावहून प्राचार्य व्ही. एस. लिपारे यांची राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये प्राचार्यपदी नियुक्ती झाली.[५४]

महाविद्यालयामध्ये २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये मूल्यांकन करण्यासाठी तज्ञ समितीची भेट होती. त्याबाबत सरांपुढे अनेक आव्हाने होती. सरांनी कुशलतेने व खंबीरपणे महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकार्याने महाविद्यालयात आवश्यक असे बदल व सुधारणा घडवून आणल्या. सरांच्या प्रयत्नामुळे महाविद्यालयातील सर्व शाखांच्या वर्गांना पुरेशी विद्यार्थी संख्या मिळू लागली. महाविद्यालयातील विद्यार्थी गुणवत्ता वाढावी यासाठी महाविद्यालयामधील प्राध्यापकांनी 'गुणवत्ता सुधार योजना', 'विद्यार्थी दत्तक योजना' या योजना यशस्वीपणे राबविल्या. यासाठी प्राचार्य व्ही. एस. लिपारे यांनी प्राध्यापकांना सतत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी आणि 'नॅक' मूल्यांकनाला सामोरे जाण्यासाठी प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, शिक्षकेतर कर्मचारी यांनो अतिशय कष्ट घेतले. म्हणूनच 'नॅक' च्या तज्ञ समितीने महाविद्यालयास बी$^+$ हे मानांकन दिले.[५५]

महाविद्यालयाच्या ४२ वर्षाच्या वाटचालीमध्य प्रथमच विद्यापीठ पातळीवर 'मराठी' विषयाचे चर्चासत्र महाविद्यालयात घेण्यात आले. यासाठी सरांचे मार्गदर्शन उपयोगी ठरले. या शैक्षणिक वर्षामध्ये सरांच्या नेतृत्वाखाली कर्मवीर जयंतीनिमित्त सजवलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीमधून कर्मवीरांच्या प्रतिमेची वाजतगाजत शहरातून मिरवणूक काढण्यात आली.[५६]

सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एस. लिपारे यांची संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाली.[५७]

२००३-०४ या शैक्षणिक वर्षाच्या यशस्वी वाटचालीमध्ये प्राचार्य व्ही. एस. लिपारे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मौलिक ठरले.

**प्राचार्य सुमंत जगताप -**

प्राचार्य सुमंत जगताप यांची १ फेब्रुवारी, २००५ ते १४ सप्टेंबर, २००५ या कालावधीमध्ये प्रभारी प्राचार्य म्हणून महाविद्यालयाची सूत्रे सांभाळली.[५८]

**प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिवणकर -**

डॉ. व्ही. एस. शिवणकर यांची महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी १४ सप्टेंबर, रोजी नियुक्ती झाली. एक तरूण तडफदार अभ्यासू असे नेतृत्व महाविद्यालयास मिळाले. प्राचार्यपदाची सूत्रे हाती घेतल्यावर त्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीच्या दृष्टीने प्राध्यापक, प्राध्यापकेतर वर्ग, विद्यार्थी यांना अधिक क्रियाप्रवण बनवले.[५९]

सरांनी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक विभागांना सुरूवात केली. त्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करून विद्यार्थी देशाचे सुजाण नागरीक व्हावेत यासाठी महाविद्यायात रेव्हर्स रेंजर्स युनिटची स्थापना करण्यात आली. नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या वर्षीपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी.ए, बी.कॉम.चे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. हुशार परंतु आर्थिक दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाच्या सहकार्याने 'गुरूकूल प्रकल्प' बाबत प्रयत्न सुरू आहेत.[६०]

समाजसेवा हे रयत संस्थेचे व्रत आहे. हे व्रत महाविद्यालयामध्येही जोपासले जात आहे. २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे महापूर आला. मा.

प्राचार्य शिवणकर सर यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी पूरग्रस्तांसाठी आर्थिक स्वरूपाची मदत केली.[६१]

महाविद्यालयास २००५-०६ या वर्षी मुंबईच्या पवार पब्लीक चॅरिटेबल ट्रस्टने रू. ८०,०००/- (रूपये ऐंशी हजार फक्त) किंमतीचा एल.सी.डी. प्रोजेक्टर देणगी म्हणून दिला. वाशी (नवी मुंबई) येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने १,२३,०००/- (रूपये एक लाख तेवीस हजार फक्त) किंमतीचे प्रयोगशाळा साहित्य देणगी म्हणून दिले.[६२] विद्यापीठ अनुदान आयोग यांचेकडून यावर्षी महाविद्यालयीन ग्रंथालय इमारतीसाठी रू. ३,५०,०००/- (रूपये तीन लाख पन्नास हजार फक्त) मंजूर झाले आहेत. लवकरच ग्रंथालय इमारत बांधून घेण्याचा मानस आहे.[६३]

डॉ. शिवणकर सरांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयात भौतिक सुधारणा झाल्या. त्याचबरोबर शैक्षणिक, क्रिडा, विविध उपक्रम, योजना, विविध स्पर्धा यामध्येही विद्यार्थ्यांनी चांगले यश मिळविले आहे. २००५ पासून या संशोधन प्रकल्पाबाबत माहिती घेण्याच्या काळापर्यंत महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून डॉ. व्ही. एस. शिवणकर काम करीत आहेत.

महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील ते प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिवणकर यांच्यापर्यंतची प्राचार्यांची मालिका महाविद्यालयासाठी सतत मार्गदर्शन आणि योगदानाची उदात्त अशी उदाहरणेच ठरलेलो आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांच्या आणि रयत शिक्षण संस्थेचया धोरणांशी एकनिष्ठपणे कार्यरत राहून या सर्वच प्राचार्यांनी महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास घडविला. महाविद्यालयाच्या उभारणीत आणि वाटचालीत त्यांचे योगदान ठळकपणे जाणवते.

## संदर्भ सूची


१. वार्षिक नियतकालिक 'किर्ती' १९६७ ते ६९ व 'राजर्षी' १९६९ ते २००५.

२. 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' रयत शिक्षण संस्थेचे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर (१९८६-८७), लेख - किर्ती कॉलेज (राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज), बॅ. पी. जी. पाटील.

३. कित्ता.

४. कित्ता.

५. कित्ता.

६. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका', लेख - शाहू कॉलेजमधील अनोखे दिवस - प्राचार्य राम गायकवाङ

७. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' लेख - 'आमची पंचवीस वर्षाची वाटचाल', भाग - एक, सामाजिक-सांस्कृतिक, प्रा. चंद्रकांत पाटगावकर.

८. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका', लेख - शाहू कॉलेजमधील अनोखे दिवस - प्राचार्य राम गायकवाङ

९. कित्ता.

१०. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' लेख - 'आमची पंचवीस वर्षाची वाटचाल', भाग - तीन, क्रिडा विभाग, प्रा. रामचंद्र पाटील.

११. राजर्षी विज्ञानशखा स्मरणिका १९९४-९५, रयत शिक्षण संस्थेचे राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर, लेख - महाविद्यालयाची वाटचाल, प्रा. रामराव पाटील, प्रा. नारायण पाटोळे.

१२. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' लेख - 'आमची पंचवीस वर्षाची वाटचाल', भाग - तीन, क्रिडा विभाग, प्रा. रामचंद्र पाटील.

१३. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी' १९७५ ते १९७८.

१४. उपरोक्त, विज्ञानशाखा स्मरणिका, लेख - महाविद्यालयाची वाटचाल, प्रा. रामराव पाटील, प्रा. नारायण पाटोळे.

१५. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' १९८६-८७, लेख - 'आमची पंचवीस वर्षाची वाटचाल', भाग - तीन, क्रिडा विभाग, प्रा. रामचंद्र पाटील.

१६. उपरोक्त 'राजर्षी' वार्षिक नियतकालिक १९७६-१९७७.

१७. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' १९८६-८७, लेख - स्नेह मी जागवीन आपुला, प्राचार्य एम. एम. स्वामी.

१८. कित्ता.

१९. कित्ता.

२०. कित्ता.

२१. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' १९८६-८७, लेख - शाहू महाविद्यालयाचे स्पिरीट, प्राचार्य डॉ. एस. आर. सुर्यवंशी.

२२. कित्ता.

२३. कित्ता.

२४. कित्ता.

२५. कित्ता.

२६. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' १९८६-८७, लेख - मनातले, जे ओठावर आले ! प्राचार्य आण्णासाहेब गरूड.

२७. कित्ता.

२८. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' १९८६-८७, लेख - 'आमची पंचवीस वर्षाची वाटचाल', भाग - तीन, क्रिडा विभाग, प्रा. रामचंद्र पाटील.

२९. उपरोक्त 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका' १९८६-८७, लेख - मनातले, जे ओठावर आले ! प्राचार्य आण्णासाहेब गरूड.

३०. कित्ता.

३१. कित्ता.

३२. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९८९-९१.

३३. कित्ता.

३४. 'राजर्षी' वार्षिक नियतकालिक, १९९१ ते १९९३ व १९९५ ते १९९८.

३५. उपरोक्त विज्ञानशाखा स्मरणिका १९९४-९५, लेख - महाविद्यालयाची वाटचाल, प्रा. रामराव पाटील, प्रा. नारायण पाटोळे.

३६. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९९१-९२.

३७. कित्ता.

३८. कित्ता.

३९. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९९३-९४.

४०. कित्ता.

४१. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९९५-९६.

४२. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९९७-९८.

४३. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९९३-९४.

४४. उपरोक्त विज्ञानशाखा स्मरणिका १९९४-९५, लेख - महाविद्यालयाची वाटचाल, प्रा. रामराव पाटील, प्रा. नारायण पाटोळे.

४५. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९९३-९४.

४६. कित्ता.

४७. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', १९९८-२०००.

४८. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', २०००-२००१.

४९. कित्ता.

५०. कित्ता.

५१. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', २००२-२००३, पृ. क्र. ३.

५२. कित्ता, पृ.क्र. ४.

५३. कित्ता, पृ.क्र. ८५.

५४. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', २००३-२००४, पृ. ५.

५५. कित्ता, पृ.क्र. ६.

५६. कित्ता.

५७. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', २००५.

५८. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी', २००५-२००६, पृ. क्र. ४.

५९. कित्ता, पृ.क्र. ६.

६०. कित्ता, पृ.क्र. ८६.

६१. कित्ता, पृ.क्र. ६.

६२. कित्ता, पृ.क्र. ८१.

❑❑❑